शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १०३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## पत्रकारांना सोशल मीडियावर शिवीगाळ व धमक्या

### पत्रकार संघटनांकडून पोलीस अधीक्षकांना निवेदन; कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील पत्रकारांना सोशल मीडियावरून केलेल्या शिवीगाळ, धमक्या आणि अवमानकारक पोस्टच्या निषेधार्थ विविध पत्रकार संघटनांनी एकत्र येत शुक्रवार (दि ५ डिसेंबर) रोजी सायंकाळी ६ वाजता पोलीस अधीकरणात धाव घेतली. अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

दोन दिवसांपूर्वी काही पत्रकारांनी स्वयंघोषित धनगर समाज नेते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दीपक बोऱ्हाडे यांच्याविषयी एक बातमी प्रसारित केली होती. या बातमीमध्ये कृष्णा गायके या तरुणाची प्रतिक्रिया प्रसिद्ध करण्यात आली होती, ज्यात त्याने बोऱ्हाडे यांच्याविरोधात काही गंभीर आरोप व खुलासे केले होते. दरम्यान, ही बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर दीपक बोऱ्हाडे यांनी सोशल मीडियावर सूडबुद्धीने पत्रकारांना उद्देशून अश्लील शिवीगाळ, धमकावणी तसेच अवमानकारक पोस्ट केल्याचा आरोप पत्रकारांनी निवेदनात केला आहे. बोऱ्हाडे यांच्या फेसबुक पेजवरून, तसेच त्यांच्या समर्थकांकडून पत्रकारांना बदनाम करणाऱ्या पोस्ट व्हायरल झाल्याचेही पत्रकारांनी पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले.

पत्रकारांनी दिलेल्या निवेदनात पुढील प्रमुख मागण्या करण्यात आल्या, दीपक बोऱ्हाडे आणि त्यांच्या समर्थकांविरुद्ध सायबर गुन्हा, धमकी, बदनामी यांसह कायदेशीर कारवाई करावी पत्रकारांचे संरक्षण सुनिश्चित करावे, पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करावा, फ ेसबुक आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून अवमानकारक पोस्ट तात्काळ हटवून तपास करावा. पत्रकारांनी यावेळी सांगितले की, समाजामध्ये पत्रकारांची सुरक्षितता धोक्यात येत असून, सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असलेल्या धमक्या आता चिंताजनक पातळीवर पोहोचत आहेत.

**पोलीसांचा सकारात्मक प्रतिसाद**

अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांनी पत्रकारांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून त्वरित चौकशी सुरू करण्याचे आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. सायबर पोलिसांनाही आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. पत्रकारांनी जालना सायबर पोलिस स्टेशन, कदीम जालना पोलीस ठाणे, तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातही निवेदनाची प्रत दाखल केली. यावेळी इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन आणि विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. आमेर खान (इंडियन जर्नालिस्ट असोसिएशन - जालना जिल्हाध्यक्ष), दीपक शेळके (प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र - जालना जिल्हाध्यक्ष), अच्युत मोरे (महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ - जिल्हाध्यक्ष), जावेद खान, योगेश काकफळे, सुनील भारती, सचिन सर्वे, सुहास वैद्य, संतोष भुतेकर, शेख सलीम, विजय साळी, बासीत बेग, राहुल मुळे, गौरव साळी, नाझिम मणियार, तरंग कांबळे, सोनाजी जोगदंडे, आकाश माने, देवचंद सावरे आदी पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिल्लीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील ऐतिहासिक शस्त्रांचे भव्य प्रदर्शन!

### ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त होणार ‘शौर्याचा शंखनाद’!




**नवी दिल्ली -** येथील प्रतिष्ठित ‘भारत मंडपम्’ (इंद्रप्रस्थ) येथे १३ व १५ डिसेंबर रोजी आयोजित होत असलेल्या ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हून अधिक दुर्मिळ आणि ऐतिहासिक शस्त्रे दिल्लीमध्ये प्रदर्शित होत आहेत. ही सर्व शस्त्रे महाराष्ट्रातून विशेष सुरक्षा व्यवस्थेत दिल्लीला आणली जात असून राजधानीत अशा ऐतिहासिक स्वरूपाचे शस्त्रप्रदर्शन पाहायला मिळणार आहे. ‘सेव्ह कल्चर, सेव्ह भारत फाउंडेशन’ प्रस्तुत आणि सनातन संस्था आयोजित महोत्सवात या शिवकालीन शस्त्रप्रदर्शनाद्वारे ‘शौर्याचा शंखनाद’ होणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली आहे.




सनातन संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने देशाच्या राजधानीत होणाऱ्या महोत्सवात दिनांक १३ ते १५ डिसेंबर या तीन दिवसांच्या ‘स्वराज्याचा शौर्यनाद’ या नावाचे भव्य प्रदर्शन लावण्यात येणार आहे. हे प्रदर्शन हॉल क्रमांक १२ मध्ये सर्वांसाठी खुले राहील. या प्रदर्शनीत छत्रपती शिवाजी महाराजांनी हाताळलेल्या अनेक शस्त्रांचे साक्षात दर्शनही घेता येईल. यासमवेतच अन्य मराठा साम्राज्यातील सेनापतींनी चालवलेली शस्त्रे असणार आहेत. त्यात सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा भाला यांसारखी विविध शस्त्रे असतील.

तसेच महाराणा प्रताप यांच्या काळातील शस्त्रांसह कर्नाटकातील विजयनगर साम्राज्यकालीन तलवारी, शिवकालीन युद्धपरंपरा, धातूशास्त्र, ‘लोखंड ते शस्त्र’ या संकल्पनेवर आधारित मराठा शस्त्रनिर्मिती प्रक्रिया आणि मराठा सामरिक बुद्धिमत्तेचे दर्शन यांचा समावेश असेल. तसेच हिंदू स्त्रियांनी आत्मरक्षणासाठी वापरलेल्या शस्त्रांचेही प्रदर्शन होणार असून त्या काळातील स्त्रियांची रणशक्ती आणि युद्धातील भूमिका अधोरेखित केली जाणार आहे. हे केवळ प्रदर्शन नसून हिंदवी स्वराज्याच्या तेजातून ‘सनातन राष्ट्रा’ची नवी प्रेरणा देणारा आध्यात्मिक आणि ऐतिहासिक अनुभव ठरणार आहे.

या महोत्सवात श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेवगिरी महाराज यांच्यासह अनेक संत-महंत उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच केंद्रीय पर्यटन व संस्कृती मंत्री श्री. गजेंद्रसिंह शेखावत, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री श्री. संजय शेठ, दिल्लीचे सांस्कृतिक मंत्री श्री. कपिल मिश्रा, छत्रपती खासदार श्रीमंत उदयनराजे भोसले, अधिवक्ता विष्णू जैन यांसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव’ हा केवळ कार्यक्रम नसून राष्ट्ररक्षण, संस्कृती, शौर्य आणि हिंदवी स्वराज्याच्या तेजाचे पुनरुज्जीवन आहे. आजच्या काळातील विविध सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर शिवकालीन शस्त्रे, युद्धकला आणि राष्ट्रधर्म यांची आठवण तरुणांना नवचैतन्य देणारी ठरेल. सर्व हिंदूंसाठी हा महोत्सव विशेष अभिमानाचा क्षण आहे.

हा महोत्सव पाहण्यासाठी व यात सहभागी होण्यासाठी SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करावी, असे आवाहन असेही श्री. अभय वर्तक यांनी केले आहे.

युवा आदर्श

**भिम आवेश ...**

काळाराम मंदिरात
असावा मुक्तप्रवेश
भिमराव आवाहने
येई आगळा आवेश
निमित्ताने मनामना
रुजला सार्थ संदेश
निळसूर्या दूर गामी
तव प्रत्येक आदेश
सनातनी हातावरी
बदलली ती रेष रेष
जाणवे शक्ती आता
एक जात एक देश
दारे नाही अक्षखुले
रोमा रोमा नवोन्मेष
माणूस आतसारखा
भिन्न जरी वरी वेश
परिवर्तन नवी नांदी
ओलांडली नवी वेश
मरगळल्या समाजा
येई जोश भरे त्वेश
भेदाभेद द्यावा छेद
करावा कशास द्वेष
आपपर भाव फुका
राहू नये काही शेष
जाणवते जनतेला
झाले कसले क्लेश
आठवा महामानवा
जीवन होई विशेष

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### बागेश्वरी कारखाना दुपटीने ऊस गळपासाठी सज्ज

## दररोज १० हजार मेट्रिक टन होणार गळप

**परतुर । प्रतिनिधी -** मॉ बागेश्वरी साखर कारखान्याची गाळप क्षमता वाढवण्यात आली असून येत्या ५ डिसेंबर पासून कारखान्यात दुपटीने उसाचे गाळप होणार असून दररोज १० हजार मेट्रिक टन होणार असल्याची माहिती बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी दिली आहे.

बागेश्वरी साखर कारखाना सुरळीत सुरू असून साखर कारखान्याची दररोजगाळत क्षमता ५ हजार मॅट्रिक टन होती मात्र ती आता दुपटीने म्हणजे १० हजार मॅट्रिक टन दररोज क्षमता करण्यात आली आहे. या वाढीव गाळप क्षमतेचा शुभारंभ दिनांक ५ डिसेंबर पासून करण्यात येत आहे. क्षेत्रात एकूण ११ हजार ८६१ हेक्टर उसाचे क्षेत्र आहे यापैकी आतापर्यंत १ लाख २७ हजार ७६५ मॅट्रिक टन उसाचे गाळप झाले आहे तर यातून १ एक लाख १२ हजार ५० क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे साखरेचा उतारा १०.२२ आज अखेर ९.०९७ टक्के आला आहे. उपरोक्त उत्पादनाचा विचार करता बागेश्वरी कारखाना कार्यक्षेत्रात ११ लाख५० हजार मॅट्रिक टन ऊस गळपास उपलब्ध होईल. एकूणच कारखान्याची गाळप क्षमता दुपटीने झाल्यामुळे सर्व शेतकऱ्यांचा ऊस जाणार असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

५ तारखेपासून दुपटीने गाळप क्षमता चेअरमन शिवाजीराव जाधव. यावेळी चेअरमन शिवाजीराव जाधव पान २ वर

## जालना तालुका हद्दीत रात्री उशिरापर्यंत परवानाविना दारू विक्री

### पोलीस गस्त असूनही अवैध धंद्यांना छुपा पाठींबा?

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्री, परवानाविना चालणारे ढाबे, हॉटेल्स व अंडा-गाड्यांवरून रात्री उशिरापर्यंत धंदा जोरात सुरू असल्याचे गंभीर चित्र पुढे आले आहे. विशेष म्हणजे रात्रीची पोलीस गस्त असलेल्या गाड्या सायरन वाजवत त्या मार्गावरून फेरफटका मारतात; मात्र अवैध दारू विक्री मात्र बिनधास्तपणे सुरुच राहते. ही बाब जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेवरील मोठा प्रश्नचिन्ह ठरत आहे.

**सीसीटीव्ही फुटेजमध्ये धंद्याचे पुरावे**

शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी मध्यरात्री १२ नंतर ते पहाटे १.३० वाजेपर्यंत मंठा चौफुली परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये उशिरा पर्यंत सुरू असलेल्या हॉटेल्स आणि अंडा-गाड्यांवर गर्दी दिसून येते. त्याचवेळी तालुका पोलिसांची गस्तीची वाहनेही त्या मार्गावरून जाताना दिसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

परवानाविना दारू विक्री - काही हॉटेल्स व गाड्यांची नावालाच तपासणी? सिंदखेड राजा-नाव्हा रोड, मंठा चौफुली, मंठा रोड, अंबड चौफुली, अंबड रोड आदी मार्गांवरील अनेक ढाबे व हॉटेल्समध्ये परवानाविना दारू विक्री, ग्राहकांना रात्री १ ते २ पर्यंत बसवणे, काही ठिकाणी तर उघडपणे बाटल्यांची विक्री असे प्रकार सुरू असल्याची स्थानिकांकडून तक्रारी येत आहेत. हे सर्व पोलीसांच्या गस्त मार्गावर असूनही कोणतीही कारवाई न होणे हे ‘जाणूनबुजून दुर्लक्ष’ की ‘इतर कारणांमुळे होत असलेला अवैध पाठींबा’ या संशयाला वाव देत आहे.

पोलीस कायद्यानुसार ही गंभीर गुन्हेगारी महाराष्ट्र उत्पाद शुल्क कायदा १९४९ नुसार- परवानाविना मद्य विक्री करणे हा दंडनीय गुन्हा प्रथम गुन्ह्यासाठी दंडः रु १०,००० पर्यंत पुनरावृत्ती किंवा प्रमाण मोठे असल्यासः तुरुंगवास + दंड भारतीय दंड संहिता (BNS २०२३) नुसार सार्वजनिक शांतता भंग, अवैध जमाव तयार करणे, रात्री उशिरापर्यंत अवैध व्यावसायिक क्रिया पोलिसांना फसवणे / माहिती न देणे, या सर्वांचा समावेश गुन्हेगारी आचरणात होतो.

**अवैध दारू विक्रीमुळे गुन्ह्याच्या प्रमाणात वाढ होत आहे.** चोरी, घरफोड्या, भांडणे दारू पिऊन वाहनचालकांचे अपघात, रस्त्यावर वाद-विवाद, मारामाऱ्या यामध्ये मोठी वाढ. अवैध गुटखा-साठा आणि इतर गुन्ह्यांना खतपाणी अवैध दारू विक्री सुरू राहणाऱ्या मार्गांवरच गुटखा, आणि इतर अवैध धंदेही वाढत असल्याचे स्थानिक सांगतात. रात्रभर सामाजिक असुरक्षितता महिला, विद्यार्थी, रात्रीच्या शिफ्टमधील कर्मचाऱ्यांसाठी धोका वाढतो.

**पोलीसांचे कर्तव्य - काय करायला हवे होते?**

रात्री ११ नंतर कोणतेही ढाबे, हॉटेल्स तासनतास उघडी ठेवणे नियमबाह्य पोलीसांना तपासणी, दंड आणि तात्काळ बंद करण्याचा अधिकार आहे. परवानाविना दारू विक्रीवर तात्काळ छापा उत्पाद शुल्क विभागासह संयुक्त कारवाई अपेक्षित. सीसीटीव्ही फुटेज गोळा करून गुन्हे दाखल करणे क्षेत्रातील फुटेजमधून पुरावे मिळतात-गुन्हा नोंदवणे आवश्यक. गस्त असूनही १-२ वाजेपर्यंत अवैध धंदा सुरू राहणे म्हणजे गस्त औपचारिक? की कोणीतरी लाभ घेतोय? ही चौकशी वरिष्ठ पातळीवर आवश्यक आहे.

या सर्व प्रकाराकडे वरिष्ठ पोलीस अधीक्षकांनी तातडीने हस्तक्षेप करावा, सीसीटीव्ही फुटेज जप्त करून कारवाई करावी, वसूलीच्या शंकेची स्वतंत्र तपासणी करावी, अवैध दारू विक्री पूर्णपणे बंद करावी अशी अपेक्षा सूज्ञ नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## महिलांविरुद्धच्या हिंसाचाराचा बिमोड आणि सुरक्षित समाजासाठी अभियान




**जालना । प्रतिनिधी -** संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने जगभरात २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या काळात महिलांविरुद्धच्या हिंसाचाराविरोधात जनजागृती पंधरवडा राबविला जातो. याच जागतिक मोहिमेचा भाग म्हणून, जालन्यातील इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन, इनरव्हील क्लब ऑफ जालना आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल या तीनही क्लबच्या संयुक्त विद्यमाने ऑरेंज द वर्ल्ड हा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्या अंतर्गत महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि सक्षमीकरणासाठी समाजाला बदलाचे सशक्त आवाहन केले आहे.

भारतीय संस्कृतीत स्त्रीला केवळ व्यक्ती नव्हे, तर 'शक्ती' आणि संस्कृतीची वाहक मानले गेले आहे. रामायणातील सीताहरण असो वा महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरण; जेव्हा जेव्हा स्त्रीचा अवमान झाला, तेव्हा समाजाला मोठी किंमत मोजावी लागली, हा इतिहास आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांसारख्या महापुरुषांनी रणांगणावरही शत्रूच्या स्त्रियांचा सन्मान करून जगासमोर आदर्श ठेवला होता. मात्र, आजचे वास्तव चिंताजनक आहे. आधुनिक युगातही घरगुती हिंसाचार, लैंगिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी होणारे शोषण आणि सायबर गुन्हे (ऑनलाइन बदनामी) अशा पान २ वर

संपादकीय पान

## डॉ बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता!

विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दीन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वतःचे वर्तमानपत्र असावे असे डॉ बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. 'मूकनायक' पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. 'मूकनायक' एप्रिल १९२३ मधे बंद पडले. इ.स. १९२४ मध्ये डॉ बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी आम्ही शासनकर्ती जमात बनणार या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते. पत्रकार महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

# मानवतेची दिव्य ज्योत निर्माता वंदनीयच!

भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेतला. ते देशासाठी व समाजासाठी अहोरात्र झटले. त्यांनी सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरत आहे. अशा या थोर महापुरुषात विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात प्रथम उच्चारावे लागते. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख

डॉ.बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने त्यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलितगात्र झालेल्या मनामनांतून बहुजन समाजक्रांतीचे स्फुलींग चेतविले. त्यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. बाबासाहेब म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय. ते नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मानव मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले. रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्रीवर्गाच्या, शेतकरी-मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखवली. मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीयच नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार तथा भारताच्या राष्ट्रीय ग्रंथ- संविधानाचे ग्रंथकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर होत. त्यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. बाल भीमावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून ते दांपत्य दक्ष असत. स्वतः सह भीमरावांना वाचनाची खुप आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. वडील रामजी हे मुलांनाही चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्यांच्या ठायी आढळते. जगद्गुरू संत तुकारामजी व संतशिरोमणी कबीर हे बाबासाहेबांच्या भावी आयुष्यात अभ्यासाचे विषय झालेले दिसतात.

शैक्षणिक विचारः शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी, यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो माणूस प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही,'' असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. ''प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे. त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणार्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन इ.स.१९४६ साली करून त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरू केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय, असे ते मानत.

प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा : डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ.आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले, डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार की काय? परंतु या महामानवांनी निक्षून सांगितले, ''आम्ही या भारत देशाची संतान आहोत. आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच. राष्ट्रावर संकट आल्यास प्राण पणाला लावून देशाचे रक्षण केले व पुढेही करूच!'' यात डॉ.आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा सामावलेली दिसून येते.

सामाजिक क्रांतीः डॉ.बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीती, अत्याचार, अन्याय यांना त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय बहुजन समाज एकसंघ होणार नाही, असे ते समजत. डॉ.बाबासाहेब म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क हे आपल्याला कळत नाही, अशा प्रकारे त्यांनी समाजात सामाजिक क्रांतीचे रणशिंगच फुंकले.

श्रमजीवी व दलितांचे कैवारीः स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरीही त्यांनी दूर केली. इ.स.१९२७ ते १९५६पर्यंतच्या काळात त्यांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केले. सन १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा. सर्व द्रुगुणांपासून दुर रहा. मुलामुलींना शिक्षण अवश्यच द्या. त्यांना महत्वाकांक्षी बनवा. त्यांचा न्यूनगंड दूर करा, अशा महत्वपूर्ण उपदेशांचे डोळ्यांत झणझणीत अंजन घातले. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजीवींसाठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे, म्हणून ते आजीवन सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे, तर शेतकरी, शेतमजूर, मजूर आणि कामगार आदींच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व बहुजनवर्गाच्या समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महानतम सर्वोत्तम देणगी होय. अशा या महामानवाचे दि.६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा आमच्यासाठी मागे उमटवून ठेवला. नमो बुद्धाय, जय भीम!

!! महापरिनिर्वाण दिनी महामानवास विनम्र अभिवादन !!

## सिंदखेडराजा राजा येथे वसंतराव नाईक साहेब गौरव दिन साजरा

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी -** जिजामाता हॉल येथे वसंतराव नाईक गौरव दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी नाईक साहेबांच्या पुतळाचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. विजय राठोड दत्तापुर तांडा,रोहिदास राठोड नशिराबाद तांडा,राम राठोड पिंपरखेड तांडा,दत्तु भाऊ चव्हाण गारखेड तांडा,जगण चव्हाण वासंतगर तांडा, बंडु पवार वसंत नगर,प्रदीप बिलोरे आडगाव राजा, राजु आढाव सिंदखेडराजा इतर सर्व मान्यवर सिंदखेड राजा नगरी व बंजारा समाज बांधव नाईक साहेबांच्या शपथविधी सोहळा सिंदखेड राजा परिसरातील पंचायत समिती कार्यालय



येथे नाईक साहेबांचे पूजन करून, पुष्पहार अर्पण ५ डिसेंबर १९६३ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री दिवस गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.

पान १ वरुन

### दररोज १० हजार ...

म्हणाले की उसाचा हमीभाव २९०० रुपये देण्यात येणार आहे पहिला हप्ता २५००रु. दुसरा हप्ता जूनमध्ये २०० रुपये, तर तिसरा हप्ता यांच्या दिवाळीला २०० रुपये प्रमाणे अदा करण्यात येईल याबरोबरच रिकवरी अधिक आल्यास उसाचा दरही अधिक देण्याचा कारखाना प्रशासन प्रयत्न करील. तरी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी घाई न करता आपल्याच बागेश्वरीला ऊस द्यावा. एकही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहणार नाही असेही शेवटी चेअरमन शिवाजीराव जाधव यांनी सांगितले.

### जालना तालुका ...

अनेक आव्हानांना महिलांना सामोरे जावे लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाने विशाखा मार्गदर्शक तत्त्वे, सिड हल्ला नियंत्रण आणि महिलांना लष्करात समान हक्क देण्यासारखे ऐतिहासिक निर्णय देऊन कायदेशीर कवच दिले आहेच, परंतु जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत हा लढा अपूर्ण आहे. केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीवर भर देण्यासाठी या मोहिमेअंतर्गत महिलांसाठी कौशल्य विकास आणि आर्थिक स्वावलंबन कार्यशाळा,महिलांच्या कायदेशीर हक्कांबद्दल जनजागृती, किशोरावयीन मुलींसाठी आरोग्य आणि मासिक पाळी स्वच्छता मार्गदर्शन, सायबर सुरक्षा आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर यावर मार्गदर्शन, मुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षण आणि समुपदेशन आदी उपक्रम राबविले जात आहेत.

या उपक्रमाबद्दल इनरव्हील क्लब ऑफ जालनाच्या अध्यक्ष काजल पटेल, म्हणाल्या की, हिंसामुक्त समाज घडवणे ही केवळ महिलांची गरज नसून ती आपली सामूहिक जबाबदारी आहे. स्त्रीला सुरक्षित आणि सन्मानाचे वातावरण मिळावे, यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत. इनरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्ष हेमा जैस्वाल म्हणाल्या की, महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर सामाजिक मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. विशेष मोहिमेद्वारे आम्ही हीच जनजागृती घराघरात पोहोचवत आहोत. इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रलच्या अध्यक्ष पल्लवी अग्रवाल म्हणाल्या की, मौन सोडून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे ही बदलाची पहिली पायरी आहे. आम्ही या उपक्रमातून महिलांना केवळ सुरक्षितता नव्हे, तर आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी बळ देत आहोत.

# महिलांचे उध्दारकर्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर

आज डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी सण १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दुखसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलमाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषांइतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली



कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

### डोंगराळे अत्याचार प्रकरणी आक्रोश मोर्चामुळे संभाजीनगर शहर दणाणले

# फास्ट ट्रॅक खटला चालवून आरोपीला त्वरित फाशी देण्याची शासनाकडे आग्रही मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - नाशिक जिल्ह्यातील मालेगाव डोंगराळे येथील सुवर्णकार समाजातील साडेतीन वर्षाच्या चिमुकलीवर अमानुष अत्याचार करून निर्घूण हत्या झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ छत्रपती संभाजीनगर शहरात सकल सोनार समाज, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शुक्रवारी ५ डिसेंबर रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास या आक्रोश मोर्चास सुरुवात झाली. मोर्चाच्या सुरूवातीसच सदर बालिकेस श्रद्धांजली वाहण्यात आली. संबंधित आरोपीला फाशीची शिक्षा त्वरित द्यावी आणि न्याय मिळालाच पाहिजे, अशा घोषणांनी परिसर दणाणला होता. शेकडो तरूणी, महिला आणि बालिकांची संख्या सदर मोर्चात अग्रस्थानी होती. या मोर्चात विविध समाजाच्या नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहभागी होत या मोर्चास आपला पाठिंबा दिला. ठिकठिकाणी विविध नागरिकांतर्फे मोर्चेकर्यांना पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले.

या मोर्चाच्या पार्श्वभुमीवर संपूर्ण शहर आणि जिल्ह्यातील सराफांनी आपापली दुकाने बंद ठेवलेली होती. या मोर्चास जिल्ह्याबाहेरून नागरिकांची लक्षणीय संख्या होती. मोर्चाचे एक टोक क्रांतीचौकात होते तर दुसरे टोक हे गुलमंडी चौकापर्यंत होते. मोर्चेकर्यांच्या हातामध्ये विविध घोषणांचे फलक होते. तसेच सदर घटनेच्या निषधार्थ हजारो मोर्चेकर्यांनी आपल्या हाताला काळी पट्टी लावून निषेध नोंदवला. या मोर्चासाठी छत्रपती संभाजीनगर शहर आणि ग्रामीण पोलीसांचा विशेष बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

*आरोपीच्या फाशी शिवाय दुसरी शिक्षा नको : लहान मुलींची एकमुखी मागणी*

श्री संत नरहरी महाराजांचा विजय असो, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो, छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो अशा घोषणा मोर्चेकरी देत होते. क्रांती चौक, पैठण गेट, सिटी चौक, किलेअर्क मार्गे विभागीय आयुक्तलयासमोर या मोर्चाचा दुपारी अडीच वाजेच्या सुमारास समारोप करण्यात आला. यानंतर वैदेही कुलथे, आदिती डहाळे,आकांक्षा कुलथे,सिद्धी दिवेकर, आरोही काथार अशा ५ मुलींची प्रातिनिधीक स्वरूपात व्यासपीठावरून भाषणे झाली. अतिशय लहान बालिकांवर आणि स्त्रियवर अत्याचार आणि बलात्काराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. परिणामी महिला वर्गात असुरक्षिततेची भावना निमाण होत आहे. राज्य शासनाने अशा घटना होऊ नयेत म्हणून कडक कायदे अंमलात आणले पाहिजेत, असे मुद्दे या मुलींनी मांडले. यानंतर विभागीय आयुक्त प्रशासनाने मोर्चातील महिलांच्या शिष्टमंडळामार्फत निवेदन सादर करण्यात आले. शेवटी राष्ट्रगीताने मोर्चाची सांगता झाली.

यावेळी विभागीय आयुक्तालयासमोर व्यासपीठावर मध्य विधानसभेचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार प्रदीप जैस्वाल, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, मा. नगरसेवक सचिन खैरे, किशोर नागरे, आंबेडकरी नेते विजय वाहुळ, ह.भ. प. निवृत्तीनाथ वाडेकर महाराज, साध्वी सु.श्री.धर्मासिंहनी डॉ. गायत्री दिदी, सामाजिक कार्यकर्ते रमेश पाटील यांनी परखडपणे विचार मांडले.

शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते तथा मोर्चाचे प्रमुख संयोजक आदित्य दहिवाळ आणि त्यांचे सहकारी हे एका जीपमधून मोर्चकर्यांना वारंवार सूचना देत मोर्चा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत होते.

अधिवेशनात मुद्दा मांडणार : आ. प्रदीप जैस्वाल यांची ग्वाही

विधीमंडळाच्या येऊ घातलेल्या नागपूरच्या अधिवेशनात राज्य शासनाचे या प्रकरणी लक्ष वेधून संबंधित अत्याचार करणार्या नराधमास कठोरात कठोर कार्यवाही करून भर चौकात फाशीची शिक्षा द्यावी अशी आपण आग्रही मागणी सरकारपुढे निश्चित करणार असन हा खटला फास्ट ट्रॅक न्यालयात लढवण्यात यावा आणि या खटल्यासाठी सरकारी वकील म्हणून ॲड. उज्ज्वल निकम यांची नेमणूक करावी अशी मागणीही मुख्यमंत्र्यांकडे मी करणार अशी ग्वाही यावेळी आ. प्रदीप जैस्वाल यांनी केली. याप्रसंगी अतिशय परखडपणे बोलताना आ. जैस्वाल म्हणाले की, अशा बलात्कारी प्रवृत्तींना वेळीच ठेचणे गरजेचे आहे. अशा घटना वारंवार होऊ नयेत यासाठी शासनाने कडक पाऊले उचलली पाहिजे. तसेच संबंधितास शासन त्वरित कठोर कारवाई करणार नसेल तर अशा नीच प्रवृत्तींना पोलीसांकडे सोपवण्याऐवजी आमच्याकडे सोपवावे म्हणजे आम्ही त्यास आमच्या खास शिवसेना स्टाईलने धडा शिकवू असा इशारा दिला.

*अत्याचारी प्रवृत्तीला वेळीच ठेचून काढा : साध्वी सु.श्री.धर्मसिंहनी डॉ.गायत्री दिदी*

अत्याचारी प्रवृत्ती असलेल्या नराधमांची यापुढे हिंमत होऊ नये अशा प्रकारची कठोर कारवाई करावी अशी मागणी धर्मसिंहींनी दीदी यांनी केली. आजच्या स्थितीत स्त्रीवरील अन्यायाच्या विरोधात आणि हक्कांसाठी स्त्रीला रस्त्यावर येऊन लढाई लढावी लागत आहे अशी शोकांतिका आहे. राज्य शासनाने डोळेझाक करू नये आणि अत्याचार मुक्त महाराष्ट्र खर्या अर्थाने घडवायचा असेल तर त्वरित कठोर निर्णय घ्यावा लागेल अशी मागणी केली.

याप्रसंगी आदित्य दहिवाळ, प्रमोद टेहरे, मयर रांजणगांवकर , महाराष्ट्र राज्य सराफ सुवर्णकार फेडरेशनचे सचिव सुधाकरराव धानोरकर, नरहरी सेनेचे अध्यक्ष भास्करराव टेहरे, प्रमोद टेहरे,गजानन टेहरे, संत नरहरी महाराज लाड सुवर्णकार संस्था श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरचे सहसचिव सुहास बार्शीकर, बांधकाम समिती सदस्य विजय देवळालीकर, डॉ. शरदचंद्र वानखेडे, अखिल सुवर्णकार कारागीर संघटनेचे अध्यक्ष कैलास बुटे, सुरेश टाक, सोपानराव मुंडलिक, शशिकांत उदावंत, बंडू टाक, मयुर रांजणगावकर, निखिल कुलथे, किरण बुटे,शशिकांत उदावंत, नितीन सावखेडकर, संजय सावखेडकर, विजय कल्याणकर, राम उदावंत, दिनेश दहिवाळ, नंदू चिंतामणी, योगेश शहाणे, उमेश क्षीरसागर, सुभाष उदावंत, राजेंद्र उदावंत, भगवानराव शहाणे , बाळासाहेब शहाणे,बंडू अडाणे, बालाजी टाक, मंगेश जवळगावकर,भारत कल्याणकर, श्रीधर डहाळे, ज्ञानेश्वर शहाणे, ॲड. नवीनकुमार जोजारे, प्रवीण बुरांडे, प्रा. जगदीश वेदपाठक, ॲड. नवीनकुमार जोजारे, मच्छिंद्र नागरे, स. सो. खंडाळकर, विश्वजित कुलथे, मनोहर विखणकर, अनिल सोनवणे, गणेश दुसाने, किशोर दुसाने, निखिल कुलथे, शुभम अधिकार, ओंकार शहाणे, शुभम टाक, विराज बागल, सचिन टेहरे, हरी अडाणे, अनिल टाकळीकर, सौरभ उदावंत, संतोष डहाळे, उमेश राजूरकर, सुनील क्षीरसागर, विश्वजित कुलथे, मनोहर विखणकर, अनिल सोनवणे, गणेश दुसाने, किशोर दुसाने, निखिल कुलथे, शुभम अधिकार , सौ. अनिताताई दारव्हेकर, सौ. रेखाताई डहाळे, सौ. जयश्री बुटे, सौ. अनिता शहाणे, सौ. अनिता बुटे, सौ. वंदना मांडवे, सौ. संगीता टाक, सौ. सीमा वाघ, सौ. सुनंदा डहाळे, सौ. अरुणा शहाणे, सौ. गीता शहाणे, सौ. अंजली जोजारे आदींसह हजारो नागरिक सहभागी झाले होते.






### मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विक्रम, गिनीज बुकात नोंद

# सौर ऊर्जेचा वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी –** देशात महाराष्ट्र हे सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जे वर आणून स्वतंत्र १६ हजार म ेगा वाट वीज निर्मिती करु. त्याम ुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे आश्वसन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलतांना केले.

**एका महिन्यात ४५ हजार ९११ कृषी पंप**

’मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्‌सचे कार्ल सॅबेले हे ही यावेळी उपस्थित होते.



या सोहळ्यास राज्याचे इमाव बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे,राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषद सदस्य आ. संजय केणेकर, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे,आ. प्रशांत बंब,आ. सुरेश धस, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सह व्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

**पंच कार्ल सॅबेले यांनी केली विक्रमाची घोषणा**

सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करुन त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दुरदूष्य प्रणालीने संवाद साधला. त्यानंतर गिनीज बुक विक्रम नोंदचे निरीक्षक पंच कार्ल सॅबेले यांनी विक्रमाची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र व म ेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या खखच्‌ बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

कार्ल सॅबेले म्हणाले की, विक्रम ासाठी ३५ हजार पंप स्थापित करणे आवश्यक होते मात्र प्रत्यक्षात ४५ हजार ९११ पंप स्थापित करण्यात आले, हा एक विश्वविक्रम आहे. या प्रत्येक पंपाच्या उभारणी ते कार्यान्वयन या सर्वटप्प्यांवर पडताळणी करुनच या विक्रमास मान्यता देण्यात आली आहे असे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्र थांबणार नाही**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात सुरुवातीला शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यातील जनतेचे आभार व्यक्त केले. हे जनतेला समर्पित वर्ष होते. सगळ्यांच्या जीवनात मूलभूत परिवर्तनसाठी योजना आणल्या त्या कार्यान्वित केल्या. महाराष्ट्र थांबणार नाही, असाच पुढे जात राहील, हा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**सौरपंप स्थापित करण्याच्या क्षमतेत वाढ**

श्री. फडणवीस म्हणाले की, प्रखर दुष्काळाचा सामना करतांना नेहमीच पाण्याची आणि विजेची अडचण होती. जलयुक्त शिवार योजनेमुळे पाण्याची उपलब्धता करतांना विजेच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना सिंचन करण्यात अडचण होती. दिवसा वीज मिळावी ही प्रमुख मागणी होती. रात्री अपरात्री शेतावर जाण्यात विषारी जीवजंतू, जनावरांची भीती होती. त्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचे फिडर हे सौर ऊर्जेवर नेण्याचे धोरण निश्चित केले. त्यातून एक लाख सोलर पंप ची योजना आखण्यात आली. ही योजना इतकी चांगली होती की, आपल्या राज्यातील ही योजना ही अन्य राज्यांनी जशीच्या तशी राबवावी,असे पत्र केंद्रांमार्फत इतर राज्यांना पाठविण्यात आले. त्यानुसार ‘कुसूम’ ही केंद्राची योजना तयार झाली. याच योजनेअंतर्गत आज देशात सर्वाधिक ७ लाख पंप राज्याने बसविले आहेत. शेतकऱ्यांनी मागणी केल्यापासून ते पंप बसविण्याच्या क्षमतेत वाढ कऊन आपण प्रतिक्षा कालावधीत कमी केला. म हावितरणचे कर्मचारी अधिकारी. सगळ्या पुरवठादारांचे कर्मचारी, तंत्रज्ञ यांच्या मेहनतीमुळे आज आपण हा विश्वविक्रम करु शकलो. आता हा आपला विक्रम आपणच मोडू,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढच्या वर्षभरात सौर कृषी पंपांची संख्या १० लाख झाली पाहिजे,असेही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सांगितले.

**सौर ऊर्जेद्वारे १६ हजार म ेगावॅट वीज निर्मितीची क्षमता**

श्री. फडणवीस म्हणाले की, अशा प्रकारे सौर ऊर्जेचा वापर वाढवून आपण शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र १६ हजार मेगा वॅट वीज निर्मिती करु शकतो. शिवाय ही वीज निर्मिती कोणत्याही प्रदुषणाशिवाय असेल. तिचा निर्मिती खर्च कमी असल्याने इतर क्षेत्राला लागणारी वीज मुबलक आणि स्वस्तात उपलब्ध होईल. त्यामुळे दरवर्षी ३ टक्क्यांनी आपण विजेचे दर कमी करु, असेही त्यांनी यावेळी घोषीत केले.

**मराठवाड्याचा वाटा मोठा**

मराठवाड्याचे कौतुक करतांना श्री. फडणवीस म्हणाले की, या योजनेच्या अंमलबजावणीत मराठवाड्याने आघाडी घेतली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४ हजार पंप लावण्यात आले. शेतकऱ्यांना नानासाहेब देशमुख कृषी संजिवनी योजनेमार्फत अन्य लाभ, बाजाराची उपलब्धता देऊन शेती शाश्वत कशी होईल, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. नदी जोड सारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून वाहून जाणारे पूराचे पाणी मराठवाड्यात , विदर्भात व उत्तर महाराष्ट्रात नेऊन दुष्काळ मुक्ती करायची आहे. यासर्व उपाययोजनांमुळे शेती समृद्ध आणि शाश्वत होईल. आमचे सरकार हे शेतकऱ्यांप्रती समर्पित सरकार असून शेती शाश्वत होईपर्यंत आम्ही प्रयत्न करीत राहू, असा शब्द त्यांनी यावेळी उपस्थितांना दिला.

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर व मंत्री अतुल सावे यांनीही यावेळी उपस्थितांशी संवाद साधून सौर कृषी पंप योजनेमुळे शेती क्षेत्रात आणि अर्थकारणात मोठे बदल होतील,असा विश्वास व्यक्त केला. या ठिकाणी लावलेल्या सौर ऊर्जा उत्पादनांच्या प्रदर्शनालाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी भेट दिली व पाहणी केली.

---

### खेळो इंडिया - ८१ वी अस्मिता किक बॉक्सिंग लीग २०२५-२६

# जालना जिल्हा शाईन कराटे-डु अकॅडमीच्या मुलींचा झळाळता ठसा

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती संभाजीनगर येथे २९ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या खेळो इंडिया - ८१ व्या अस्मिता किक बॉक्सिंग लीग २०२५-२६ स्पर्धेत म राठवाड्यातील नांदेड, परभणी, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांतील २०० पेक्षा अधिक मुलींनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत जालन्याच्या जालना जिल्हा शाईन कराटे-डु अॅकॅडमीच्या विद्यार्थिनींनी दमदार काम गिरी करून जिल्ह्याचा मान उंचावला.

जालना जिल्हा शाईन कराटे-डु अॅकॅडमीची विजेती त्रिकुट कामगिरी कु. तन्वी नितीन खरटमल शाळा: नारायणा ई टेक्नो स्कूल, जालना वयोगट: १३ ते १५ स्पर्धा: म्युझिकल फॉर्म यश: तृतीय क्रमांक,

कु. लावण्या किशोर गुडला कॉलेज: ग.ए.ड कॉलेज, जालना वयोगट: १६ ते १८ स्पर्धा: म्युझिकल फॉर्म यश: तृतीय क्रमांक

कु. पूर्वा सुजित माने कॉलेज: राष्ट्रमाता इंदिरा गांधी कॉलेज, रामनगर, जालना वयोगट: १६ ते १८ स्पर्धा: म्युझिकल फॉर्म यश: तृतीय क्रमांक या विजेत्या मुलींना स्पर्धेनंतर मान्यवरांच्या हस्ते मेडल आणि सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या इतर विद्यार्थिनी अॅकॅडमीच्या पुढील मुलींनीही प्रभावी प्रदर्शन करून स्पर्धे त आपली उपस्थिती ठळक केली कु. आरुषी वलकट्टी, कु. दिव्यता कोठारी, कु. वैष्णवी लोखंडे, कु. आकांक्षा चिल्का, कु. वैष्णवी लुटे, कु. आकाशी खर्डेकर.



या सर्व विद्यार्थिनींना सेन्साई रुपेन्द्र पारचा आणि सेन्साई अमन पारचा यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. अॅकॅडमीच्या या यशात त्यांचे प्रशिक्षण आणि शिस्तीचा म ोठा वाटा असल्याचे पालक व मान्यवरांनी नमूद केले.

स्पर्धेत जालना जिल्ह्याच्या मुलींनी केलेल्या यशस्वी काम गिरीबद्दल पुढील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या महाराष्ट्र राज्य किक बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष अनिल मिरकर, सुरेश मिरकर, महावीर ढक्का, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, क्रीडा अधिकारी सिद्धार्थ कदम, आशिष जोगदंड, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. वानगोता, जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, नारायणा ई टेक्नो स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीम ती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन व्यंकट राजू गुडला, यादव बापू, प्रशांत प्रेमभारती, सचिन खर्डेकर, रितेश जयस्वाल, गणेश श्रीराम तसेच उपस्थित पालकवर्गानेही मुलींच्या मेहनतीचे कौतुक केले.

---

# विद्यार्थ्यांच्या उत्तम चरित्र निर्माणासाठी मूल्यवर्धन प्रशिक्षण - प्राचार्य सान्वी देशमुख



**विशाल देशमुख -** विद्या र्थ्यांम ध्ये वाढता मूल्यांचा ऱ्हास, आक्रमकता, चिडचिडेपणा, मोबाईलचे डिक्शन हे पालकांसोबत शिक्षकांसाठी ही चिंतेची बाब आहे म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांचे वर्धन, संगोपन करण्यासाठी व विद्यार्थ्यांचे उत्तम चारित्र्य निर्माण करण्यासाठी राज्यभर मूल्यवर्धन प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मुथा फाऊंडेशन व म हाराष्ट्र शासनाचा पुढाकाराने हे प्रशिक्षण संपन्न होत आहे. सर्व शिक्षकांनी या प्रशिक्षणाद्वारे आत्मसात केलेले मूल्य विद्यार्थ्यांमध्ये बिंबवावीत.

जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यात मूल्यवर्धन प्रशिक्षण सुरू आहे. म त्स्योदरी अभियांत्रिकी महाविद्यालय जालना येथे आयोजित प्रशिक्षणाला भेट दिली याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ वैशाली जहागीरदार, डॉ प्रमोद कुमावत, प्रशिक्षण प्रम ुख योगेश्वर जाधव, डॉ करुणा हिवाळे, प्रफुल्ल राजे,छगन जाधव आदी प्रशिक्षक व शिक्षक वृंद उपस्थित होते.

---

## सर्वोच्च निकाल; मतमोजणी २१ तारखेलाच

**नागपूर –** नागपूर खंडपीठानं नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांचे निकाल हे एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाच्या या निकालाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. याबाबत आज झालेल्या सुनावणीत सर्वो च्च न्यायालयानं नगरपालिका आणि नगरपरिषदांचे निवडणूक निकाल लवकर जाहीर करण्यास नकार दिला आहे. त्यामुळं आता पुढे ढकलण्यात आलेल्या नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूक मतदान २० डिसेंबर आणि सर्व नगरपालिका नगरपरिषदांची एकत्रित मतमोजणी ही २१ डिसेंबर रोजी होणार आहे. याचबरोबर सर्वोच्च न्यायालयानं २० तारखेला मतदान होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुका काही कराणास्तव झाल्या नाहीत तर २ तारखेला मतदान झालेल्या निवडणुकांची मतमोजणी

---

# राहत सोशल ग्रुपतर्फे रविवारी मुस्लिम सामूहिक विवाह

### मुस्लिम सामूहिक विवाहात सहभागी होऊन नवदाम्पत्याना आशीर्वाद द्या – लियाकत अली खान

**जालना । प्रतिनिधी –** प्रत्येक वर्षीप्रमाणे, या वर्षी देखील राहत सोशल ग्रुप जालना रविवार, ०७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता कदिम जालना येथील आयशा लान्स उर्दू हायस्कूल मागे येथे मुस्लिम सामूहिक विवाहाचे आयोजन करत आहे. या निमित्ताने अनेक मुस्लिम जोडपी विवाहबद्ध होतील. त्यामुळे, जालना येथील सर्व नागरिकांना विनंती आहे की या शुभ प्रसंगी राहत सोशल ग्रुप जालना तर्फे आयोजित मुस्लिम सामूहिक विवाह सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि विवाह जोडप्यांना प्रार्थनांनी




आशीर्वाद द्यावे आणि त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा आणि आकांक्षा व्यक्त कराव्यात. असे आवाहन आज राहत सोशल ग्रुप जालनाचे संस्थापक सरचिटणीस लियाकत अली खान यासिर यांनी एका प्रेस निवेदनाद्वारे केले. ते पुढे म्हणाले की, राहत सोशल ग्रुप जालना गेल्या २४ वर्षांपासून जालना शहरात मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन करत आहे. मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन केले जात आहे. अल्लाहच्या कृपेने आणि दयेने आणि जालना येथील सर्व नागरिकांच्या आणि जिल्ह्यातील लोकांच्या सहकार्याने, ही संस्था मार्फत यशस्वीरित्या सामुहिक विवाह आयोजित केली जात आहे. आतापर्यंत राहत सोशल ग्रुप जालनाने ६०० हून अधिक मुले आणि ६०० हून अधिक मुलींचे विवाह केले आहेत आणि अशा प्रकारे १२०० हून अधिक कुटुंबांच्या लग्नाचा प्रश्न सोडवला गेला आहे. ही चांगली परंपरा पुढे चालू ठेवत, राहत सोशल ग्रुप जालना रविवार, ७ डिसेंबर २०२५ रोजी कदिम जालना येथील उर्दू हायस्कूलच्या मागे, आयेशा लाउंज येथे मुस्लिम सामूहिक विवाहांचे आयोजन करत आहे. त्यामुळे, जालन्याच्या नागरिकांना आणि सर्व राजकीय, सामाजिक आणि धार्मिक नेत्यांना विनंती आहे की त्यांनी या प्रसंगी आपला सहभाग नोंदवावा आणि मुस्लिम जोडप्यांना त्यांच्या प्रार्थनेने आशीर्वाद द्यावेत. या प्रसंगी राहत सोशल ग्रुप जालना शैक्षणिक, पत्रकारिता, व्यावसायिक, औद्योगिक आणि इतर क्षेत्रात



उल्लेखनीय सेवा देणाऱ्यांच्या सेवांना मान्यता देईल आणि त्यांना सन्मानाने सन्मानित करेल. म्हणून सर्वांना सहभागी होण्याची विनंती आहे. असे आवाहन राहत सोशल ग्रुप जालनाचे संस्थापक अध्यक्ष शेख अफसर शेख जी, संस्थापक सरचिटणीस लियाकत अली खान यासिर जालनवी, शेख सलीम शेख मुहम्मद, सलीम यासीन खान पठाण, सय्यद अख्तर सय्यद नूर, शेख सलीम अब्दुल शकूर, शेर जमान खान आणि राहत सोशल ग्रुप जालनाचे इतर जबाबदार सदस्यांनी केले आहे.

---

## सुरेश खोत यांचे निधन



**जालना । प्रतिनिधी –** छत्रपती संभाजीनगर येथील सा.बा.विभागातून निवृत्त जेष्ठ नागरिक सुरेश खोत (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने दि. ४ रोजी निधन झाले त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार रमेश खोत यांचे ते थोरले भाऊ होत.

## भानुदासराव सवने यांचे निधन

**परतुर । प्रतिनिधी –** तालुक्यातील दैठना खुर्द येथील प्रतिष्ठित नागरिक भानुदासराव दगडोबा सवणे वय ९१वर्ष यांचे



वृद्धापकाळाने दि ५ डिसेंबर रोजी शुक्रवारी पहाटे पाच वाजता दुः खद निधन झाले. त्यांच्या पाश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांच्यावर दैठना खुर्द येथे अंत्य संस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.